# मालमत्ता, शरीराविरूध्द व मोटर वाहन अपाघाताच्या गुन्हे तपासाबाबतची चेकलीस्ट, कॅलेंडर ऑफ इव्हीडन्स व दोषारोपपत्र तयार करणे

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विदयालय, नाशिक

# – चेकलीस्ट –

## १) मालमत्तेचे गुन्हे

- खबरी जबाब सविस्तर घेतलेला आहे काय? त्यामध्ये गेले मालाचे वर्णन सविस्तर घेतले आहेत काय?
- खबरी जबाबाची नक्कल फिर्यादीस मिळणेबाबत सही आहे काय?
- सविस्तर पंचनामा केला अगर कसे, पंचनाम्यामध्ये पंचाच्या सहया, वेळ नमुद केली आहे का?
- घटनास्थळावर काही संशयास्पद वस्तू मिळाल्या आहेत काय? त्या संबधाने तपास केला आहे काय?
- गेलेल्या मालाबाबत सर्व पोलीस ठाण्यांना बिनतारी संदशे दिला आहे काय?
- गुन्हा उघडकीस आला नसल्यास ‘ ई ’ फॉर्म पाठविला आहे काय?
- गुन्हे शाखेकडून किती आरोपींचे सजेशन आले आहे? त्यापैकी किती आरोपींना चेक केले? घरझडत्या घेतल्या?

- श्वान पथक व अंगुली मुद्रा तंज्ञ यांना पाचारण करण्यात आले होत अगर कसे?
- फिर्यादी/साक्षिदाराने आरोपीस पाहिले असल्यास त्यांना अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांचे फोटो दाखविण्यात आले आहेत काय?
- तसेच त्यांच्या सांगण्याप्रमाणे संगणकावर रेखाचित्र तयार करण्यात आले आहे काय?
- गुन्हा वरिष्ठ भेटीचा असल्यास उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी भेट दिली आहे काय?
- त्यांनी भेटीच्या वेळी काय सूचना दिलेल्या आहेत व त्याप्रमाणे तपास झाला आहे काय?

- अशा प्रकारचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील माहितीगार गुन्हेगार किती चेक केले?
- गुन्हा उघडकीस येईल असे सकारात्मक माहिती सांगणारे साक्षिदार तपासले काय?
- तसेच फिर्यादी अगर जवळच्या साक्षिदाराकडे नजीकच्या काळात रंगकाम, फर्निचर, प्लंबिग वगैरे कामासाठी व वॉचमन सुरक्षा कर्मचारी यांचेकडे चौकशी केली आहे काय?
- मुंबई पोलीस कायदा कलम–१२६ प्रमाणे किती जणांना नोटीसा दिल्या ?तपास यादया सविस्तर बनविलेल्या आहेत काय?
- त्यामध्ये मालाचे अचूक आणि सविस्तर वर्णन केले आहे काय?
- आरोपीच्या पध्दतीवरुन इतर पोलीस ठाण्यांकडून आरोपी वर्ग करुन तपास केला आहे काय?

## 2) दुखापत

- गुन्हयांची सविस्तर खबर त्यामध्ये हत्यार कोणते होते ? तसेच जखमेचे स्वरुप नमूद केले आहे काय ?
- प्रत्येक आरोपीच्या हातामध्ये कोणते हत्यार होते आणि त्याने शरीराच्या कोणत्या भागावर दुखापती केल्या आहेत. याबाबत फिर्यादीमध्ये उल्लेख आहे काय ? तसेच मेमोरँडम पंचनाम्यामध्ये फिर्यादीमध्ये उल्लेख केल्याप्रमाणेच संबंधित आरोपीकडून संबंधित हत्यार जप्त केले आहे काय ?
- गुन्हयास योग्य कलमे लावली आहेत अगर कसे ?
- दुखापत झालेल्या इसमास तात्काळ यादी देऊन औषधोपचाराकरिता पाठविले अगर कसे ?

- घटनास्थळाचा पंचनामा त्यामध्ये हत्यार जागेवर मिळून आल्यास ते जप्त करुन त्याचा उल्लेख पंचनाम्यात कलेला आहे काय ?
- जप्त केलेले हत्यार फिर्यादीत वर्णन केल्याप्रमाणे तसेच जखमेशी मिळते जुळते आहे काय ?
- साक्षीदार/फिर्यादी यांना झालेली जखम जपत हत्याराने झालेले आहे काय याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचा अभिप्राया घेतला आहे काय ?
- दुखापतीचे सर्टिफिकेट तात्काळ हस्तगत केले आहे काय ?
- प्रत्यक्ष घटना पाहणारे साक्षीदारांकडे तपास केले आहे काय ?
- पूर्वी काही तक्रारी दाखल असल्यास त्याचे उतारे कागदपत्रात सामील केले आहेत काय

- घटनास्थळाचा नकाशा काढला आहे काय ?
- आरोपीस अटक केली असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय ?
- आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे काय ?
- आरोपी जामीनावर सुटल्यास त्याचेवर तात्काळ प्रमाणपत्र हस्तगत केले आहे काय ?
- आरोपी अनोळखी असल्यास ओळख परेडची कार्यवाही केली आहे काय ?
- फिर्यादी जर शासकीय नोकर असेल व संबंधित कलमे लावली असतील तर फिर्यादी सरकारी काम करीत होता याबाबत पुरावा गोळा केला आहे काय ?

- जप्त केलेल्या हत्याराची मुद्देमाल पावती फाडली आहे काय ?
- जप्त मुद्देमाल आवश्यकतेनुसार केमिकल ॲनलायझर्सकडे पाठवून तत्संबंधी त्यांचे प्रमाणपत्र समाविष्ट केले आहे काय ?

## 3) अपघाताचे गुन्हे

- मोटार अपघाताची परिपूर्ण खबर घेतली आहे काय ?
- अपघातावरुन तत्काळ गुन्हा दाखल केला आहे काय ? तसेच गुन्हयास योग्य कलमे लावली आहेत काय ?
- अपघातामध्ये ज्याची चुकी आहे त्यावरच गुन्हा दाखल केला आहे काय ?
- अपघातामध्ये कोणत्या वाहन चालकाची चूक आहे. त्यासंबंधाने तपासी अंमलदार यांनी काय पुरावा गोळा केलेला आहे ?
- परिस्थितीनुरुप अपघातातील वाहनचालकाची मद्यपान सेवन केलेबाबत वैद्यकीय तपासणी करुन घेतली आहे काय ?

- घटनास्थळाचा पंचनामा, नकाशा काढला आहे काय ? तसेच वाहनांचा नुकसानीचा पंचनामा केला आहे काय ?
- पंचनाम्याच्या वेळी अपघाग्रस्त वाहनामध्ये किंमती माल असल्यास पंचांसमक्ष ताब्यात घेतला आहे काय ?
- अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना वैद्यकीय मदत मिळण्यासाठी काय उपाययोजना केली आहे ? तसेच त्यांच्या नातेवाईकांना माहिती दिलेली आहे काय ?
- अपघातग्रस्त वाहने सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलेली आहेत काय ?
- अपघात प्रत्यक्ष पाहणारे ति-हाईत साक्षीदार यांच्याकडे तपास केला आहे काय ?

- वाहनांतील प्रवास करणारे साक्षीदार, वाहनांचे ड्रायव्हर/क्लीनर यांचे जबाब घेतले काय ?
- अपघात गंभीर असेल तर आरटीओ यांचेकडून वाहन तपासणी जर किरकोळ अपघात असेल तर स्थानिक गॅरेजवाले यांच्याकडून वाहनाची तपासणी केली आहे काय ?
- वाहनांच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती हस्तगत केलेल्या आहेत काय ? वाहनांचा परवाना, टॅक्स, इन्शुरन्स अद्यावत आहे काय ?
- दोन्ही वाहनचालकांच्या लायसन्सच्या प्रती ताब्यात घेतलेल्या आहेत काय ?
- अपघातात जखमी असतील तर त्याचे दुखापतीचे सर्टि. कागदपत्रात सामील आहे काय ?

- अपघातात कोणी मयत असेल तर ॲडव्हान्स सर्टि. अगर शवविच्छेदन अहवाल कागदपत्रात सामील आहे काय ?
- अपघातास वरिष्ठ अधिकारी यांनी भेट दिली असल्यास त्यांनी सूचना दिल्याप्रमाणे तपास झाला आहे काय ?
- अपघात करुन वाहन निघून गेले असल्यास ते मिळविण्यासाठी काय काय प्रयत्न केले आहेत ?
- अपघाताच्या अनुषंगाने कोणाची काही तक्रार आहे काय ?

मोटार अपघातातील ड्रायव्हर यांना मोटार वाहन नियम 209 प्रमाणे नोटीस देण्यात आलेली आहे काय ?

- सर्व कागदपत्रांची कायदेशीर पूर्तता झाल्यानंतर लागलीच वाहने ताब्यात दिलेली आहे काय ?
- दाखल असलेल्या मोटार अपघाताचे संबंधाने विहित नमुन्यात माहिती भरुन मोटार अपघात न्यायधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत काय ?
- अपघातातील चूक असणा-या वाहन चालकाचा वाहन चालविण्याचा परवाना रद्द करण्याविषयी आर.टी.ओ. यांच्याकडे रिपोर्ट पाठविला आहे काय ?

## पुराव्याचा तक्ता / कॅलेंडर ऑफ इव्हीडंस –

गुन्हा दाखल झाल्यानंतर फिर्यादी व साक्षीदारांनी केलेले आरोप व तपासात निष्पन्न झालेले आरोप व आरोपीविरूध्द मिळालेले पुरावे याचे वर्गीकरण करून प्रत्येक आरोपीचा पुराव्याचा तक्ता तयार करणे म्हणजेच कॅलेंडर ऑफ इव्हीडंस होय.

दस्तऐवजी पुरावे –

१. प्रथम खबर.

२. घटनास्थळ पंचनामा

३. इन्क्वेस्ट पंचनामा.

४. घटनास्थळ नकाशा.

५. साक्षीदारांचे जबाब.

६. मेमोरंडम पंचनामा.

७.ओळख परेड.

८. फिंगर प्रींट तज्ञांचा टेस मेमो.

९. सीए तपासणी अहवाल.

१०. विवीध तज्ञांचे अहवाल.

११. वैदयकीय अधिका—यांचे दाखले.

१२. श्वान पथकाचा अहवाल.

१३. चोरीची मालमत्ता ज्यास विकली उदा. सोनार वगैरे साक्षीदार.

१४. फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग.

पुराव्याचा तक्ता / कॅलेंडर ऑफ इव्हीडंस नमुना –

............पोलीस ठाणे भाग ५ गुरक्र. ...............भादवी कलम ........... मधील आरोपींविरूध्द पुरावा तक्ता नमुना – अ

| अ.क्र. | आरोपीचे नाव | कायदा कलम | थोडक्यात व्याख्या | कलमाप्रमाणे निष्पन्न कृती | आरोप सिध्द करण्यासाकामी उपलब्ध पुरावा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तोंडी पुरावा | दस्तऐवजी पुरावा | परिस्थीती जन्य पुरावा | तांत्रीक पुरावा | वैदयकीय पुरावा |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

# (३) दोषारोपपत्र कसे तयार करावे.

## दोषारोपपत्र पाठविताना घ्यावयाची दक्षता.

- दोषारोपपत्रासोबत आरोपीच्या अटकेबाबतचा नमुना जोडला जातो त्यामध्ये आरोपीचा अचुक पत्ता, अटकेचे ठिकाण, तारीख, व वेळ, अटक करणारे अधिकारी याबाबत माहिती नमुद केली पाहीजे.
- चोरीस गेलेल्या व हस्तगत केलेल्या मालाची किमंत लक्षात येईल अशा ठिकाणी नमुद करावी.

## दोषारोपपत्रातील मजकुर

आरोपपत्राचा मसुदा खालील मुद्द्यांप्रमाणे काळजीपुर्वक भरला पाहिजे –

१. खटल्यातील पक्षकारांची नावे व गुन्हे घडल्याबाबतची सविस्तर हकीकत.

२. माहिती देणा–याचे नाव माहितीचे स्वरूप.

३. आरापीची संपुर्ण नावे व पत्ते.

४. जे आरोपी कोठडीत आहेत व जामीनावर आहेत ते वेगवेगळे दाखवावेत.

५. फरार/पळुन गेलेल्या आरोपींची नावे ठळक अक्षरात लिहावी.

६. गुन्हयात दाखविण्यात येणारी व जप्त करण्यात येणारी मालमत्ता व ज्यांचेकडुन जप्त केली त्या इसमांची नावे.

७. साक्षीदारांची संपुर्ण नावे व जर मालमत्ता ही कोणाच्या कब्जात दिली असेल तर त्याप्रमाणे त्यांची माहिती.

८. पुर्वीच्या शिक्षेबाबत माहिती.

९. गुन्हयाची माहिती सांघीक स्वरूपात व गुनहयाच्या पुराव्याबाबत माहिती.

१०. तपास अधिका–याने आरोपपत्रावर आपला हुदद्1, सही व तारीख घालावी.

११. आरोपीस दिलेल्या कागदपत्रांची यादी व ती मिळलेबाबत आरापीची सही याची यादीदेखील आरोपपत्राबरोबर दयावी.

➢ दोषारोपपत्रासोबत जोडावयाचा दस्तऐवज –

१. सर्व कागदपत्रे ज्यावर सरकारपक्ष अवलंबुन राहणार आहे.

२. चोरीस गेलेल्या मालमत्तेची यादी.

३. आरोपीकडुन मिळालेल्या किंवा त्याचेकडुन जप्त केलेल्या मालमत्तेची यादी.

४. आरोपीच्या पुर्वशिक्षेबाबत अहवाल.

५. जामीनावर मुक्त केले असल्यास बंधपत्र व जामीनदारांची बंधपत्र.

६. आरोपपत्र दाखल करण्याबाबत परवानगी दिलेबाबतचे आदेश.

- आरोपपत्र हे सर्व पुराव्यानिशी काळजीपुर्वक दाखल करावे. प्रतीवादी पक्ष खालील मुदद्यांवर खटला उलटविण्याचा प्रयत्न करू शकतो.

१. गुन्हा घडलाच नाही.
२. जरी गुन्हा घडला तरी तो वेगळया जागी व वेळी घडला.
३. आरोपपत्रात नमुद केल्यापेक्षा इतर दुसराच गुन्हा घडला आहे.
४. ज्याचेवर गुन्हा दाखल केला आहे तो आरोपी निर्दोष आहे. त्यामुळे गोळा केलेला पुरावा प्रतीवादीच्या खालील मुदद्यांना उलटवुन लावतील असा असावा.

- दोषारोपपत्रात खालील टिपा नमुद कराव्यात.

अ) केसच्या सुनावणीची तारीख निश्चित झाल्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांना समन्स काढुन बजावणीसाठी पाठवावेत.

ब) पोलीस अभियोक्ता यांना अभियोग चालविण्यासाठी पत्राने विनंती केली असल्याबाबत नमुद करावे.

क) दोषारोपपत्रासह तपासाचे मुळ कागदपत्रे फेरीस्तप्रमाणे जोडली आहेत.

ड) दोषारोपपत्रातील एखादया आरोपीने कबुलीजबाब दिला असल्यास तसे नमुद करावे.

ई) दोषारोपपत्रातील आरोपीस पुर्वशिक्षा असल्यास त्याबत भा.द.वि.स. कलम ७५ नुसार शिक्षेत वाढ होण्याकरीता कार्यवाही व्हावी म्हणुन नमुद करावे.

फ) आणखी पुरावा लागल्यास देण्याची तजबीज असावी.

ग) न्यायवैज्ञानिक विश्लेषकाकडे तपासणीकरीता जप्त मुद्देमाल पाठविला असल्यास त्याबाबतचा अभिप्राय व मुद्देमाल न्यायालयात दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे असे नमुद करावे.

- एकाहुन जास्त आरोपी विरुध्द दोषारोपपत्र पाठविताना त्या गुन्हयांतील प्रत्येक आरोपीचा गुन्हयात नक्की कशा प्रकारे सहभाग आहे. याबाबत दोषारोपाच्या मजकुरामध्ये स्पष्ट उल्लेख करणे अंत्यत जरुरीचे असते. अन्यथा त्या बाबीचा फायदा आरोपीस होतो. उदा.— ''अ'' याच्या खुनाबाबत''ब''''क''''ड'' यांचे विरुध्द दोषारोपपत्र लिहीताना त्यामध्ये ''ब'' ने डोक्यात काठी मारली, ''क'' ने हातातील चाकु पोटात मारला व ''ड'' ने ''अ'' चे हात धरले असा मजकुर नमुद करणे आवश्यक असते.
- आरोपीस पुर्वशिक्षा झालेल्या असल्यास दोषारोपपत्र पाठविताना पुर्वशिक्षेबाबतचे पुरावे व आवश्यक नोंदीचे कागदपत्र सादर केले पाहिजेत. पुर्वशिक्षेची माहिती कागदपत्रात दोषारोपपत्र पाठविण्यापुर्वी मिळाली नाही तर त्याबाबत दोषारोपपत्रात नमुद करावे.

टिप:— दोषारोपपत्रात भा.द.वि.स. कलम ७५ लावण्याचे टाळणे म्हणजेच अपुरी शिक्षा देण्याकडे केलेली वाटचाल होय.